# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


**दिनांक २५/०७/२०२४ (गुरूवार) दुपार**

---

**नागपूर ग्रामीण हद्दीत सट्टापट्टी लिहणाऱ्या व जुगार खेळणारे आरोपीतांविरूद्ध कारवाई**

दिनांक २४/०७/२०२४ रोजी नागपूर ग्रामीण जिल्हयात अवैध धंदेवाईकावर धाडसत्र मोहीम राबविण्यात आली. पोलीस स्टेशन काटोल, कोंढाळी, खापरखेडा अंतर्गत लोकांकडुन पैसे घेवुन वरली मटक्याचे सट्टीपट्टीचे आकडे लिहुन जुगार खेळ खेळविणारे एकुण १० इसमांवर कारवाई करण्यात आली. त्यांचे ताब्यातून सट्टापट्टीचे साहित्य व नगदी असा एकुण २७९०/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

पोस्टे कोंढाळी येथील स्टाफ पोस्टे हद्दीत पेट्रोलींग करीत असता गोपनीय माहिती मिळाली की, मौजा कोंढाळी बाजार चौक कोंढाळी येथे पिंपळाच्या झाडाखाली एक इसम वरली मटक्याचे आकडे लिहुन लोकांकडुन पैसे घेवुन हारजितचा जुगार खेळवत आहे. अशा खात्रीशीर बातमीवरून मौजा बाजारचौक कोंढाळी येथे रेड कारवाई केली असता **आरोपी नामे— पुरूषोत्तम गोविंदराव नागोसे, वय ४२ वर्ष, रा. उमाटे नगर कोंढाळी** याची अंगझडती घेतली असता त्याचे खीशातून सट्टापट्टी आकडे लिहलेला कागद, एक निळा पेन ०५/—रू. नगदी ३२०/—रू. असा एकुण ३२५/— रू. चा मुद्देमाल जप्त करून आरोपीविरूध्द पोलीस ठाणे कोंढाळी येथे कलम १२ अ महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

पोस्टे काटोल येथील स्टाफ पोस्टे हद्दीत पेट्रोलींग करीत असता गोपनीय माहिती मिळाली की, तार बाजार काटोल येथे लक्ष्मी कपडयाचे दुकानासमोरील पानठेला जवळ एक इसम सार्वजनिक ठिकाणी बसून लोकांकडुन पैसे व वरली मटक्याचे आकडे स्विकारून ते आकडे कागदावर लिहुन हारजितचा जुगार खेळवत आहे. अशा मिळालेल्या माहिती वरून तार बाजार काटोल येथील लक्ष्मी कपडयाचे दुकानासमोरील पानठेल्याजवळ छापा टाकुन **आरोपी नामे— राजेश छोटेलाल बेहनिया, वय ५० वर्ष, रा. कारला पोस्ट येणवा ता. काटोल जि. नागपूर** याची अंगझडती घेतली असता त्याचे ताब्यातून एक काळया शाहीचा पेन, वरली मटक्याचे आकडे लिहलेले एक कागद व शर्टच्या खिशात नगदी ३१०/—रू. असा एकुण ३१०/—रू. चा मुद्देमाल जप्त करून आरोपीविरूध्द पोलीस ठाणे काटोल कलम १२ अ महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

पोस्टे खापरखेडा येथील स्टाफ पोस्टे हद्दीत पेट्रोलींग करीत असताना **आरोपी नामे—१) राम हनुमानप्रसाद निर्मल वय २६ वर्ष रा. वार्ड नं. ६. चनकापूर ता. सावनेर जि. नागपूर** हा मौजा अण्णा मोड चनकापूरकडे जाणा—या रोडवर चौधरी यांचे पानठेल्याचे गोडावुन मध्ये आरोपी क्र. **२) श्यामसुंदर उर्फ नेपाली कनोजिया रा. वार्ड नं. ३. चनकापूर** याचे सांगणेवरून लोकांकडून पैसे घेवुन हारजितचा जुगार खेळविताना मिळुन आल्याने त्यांचे जवळुन सट्टापटटीचे साहीत्य व नगदी ८५०/— रू चा मुद्देमाल मिळुन आल्याने नमुद दोन्ही आरोपी विरुध्द पोस्टे खापरखेडा येथे कलम १२ (अ) महा. जु. का सहकलम ४९ भारतीय न्याय संहीता अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

पोस्टे देवलापार येथील स्टाफ पोस्टे हद्दीत पेट्रोलींग करीत असता मुखबीरद्वारे विश्वसनीय माहिती मिळाली की, मौजा खुर्सापार येथे काही इसम ताशपत्त्यावर हारजितचा जुगार खेळत आहे. अशा मिळालेल्या माहिती वरून मौजा खुर्सापार शिवारातील चंदु टेकाम याचे पानठेल्याजवळ खुल्या जागेत काही इसम ताश पत्त्यावर पैशाची बाजी लावुन जुगार खेळताना दिसुन आल्याने **आरोपी नामे— १) सुबोध रतनलाल इडपाची, वय ३८ वर्ष, २) राजेंद्र चैतु इडपाची, वय ४० वर्ष, ३) चंदु हरीराम टेकाम, वय २५ वर्ष, ४) राजु श्रावण भलावी, वय ३७ वर्ष ५) गोविंद श्रीराम टेकाम,**

**वय २९ वर्ष, ६) संजु श्रावण भलावी, वय ३३ वर्ष, सर्व रा. खुर्सापार रामटेक** हे ५२ ताशपत्त्यावर पैशाची बाजी लावुन हारजितचा जुगार खेळताना मिळुन आल्याने आरोपीतांकडुन ५२ ताशपत्ते व एकुण १३०५/—रू. चा मुद्देमाल जप्त करून आरोपीतांविरूद्ध कलम १२ मुजुका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**